RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MNW/35/2017-2019
Published on : 12 September, 2017 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 14 September, 2017

अजायब बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : पंधरा | अंक : तिसरा | सप्टेंबर २०१७

आ सजना चल (भजन) 4

पवित्र हृदयाची कल्पना 6

परमात्म्याची मर्जी (सत्संग) 7

प्रश्नोत्तरे 17

दर्शनाची ओढ (सत्संग) 21

धन्य अजायब 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

आ सजना चल शगन मनाईए

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या जन्मदिवसा निमीत्त एक भजन

आ सजणा चल, शगन मनाईऐ, (२)
रलके* मनाईऐ सारे, हसिऐ ते गाईऐ, आ सजणा...

१. जन्म दिहाड़ा, अजायब सोहणे सजण दा,
भागां नाल आया दिन, साडे हसण दा, (२)
खुशियां च सारे कैहंदे, जश्न मनाईऐ, आ सजणा...

२. जन्म दिहाड़ा तेरे, नाल सोहणा लगदा,
देखो नीं सईयो मेरा, सोहणा गुरु फब्बदा*, (२)
सारे रल मिल अज, खुशियां मनाईऐ, आ सजणा...

३. सामने तूं बैठा प्यारे, बहुत सोहणा लगदा,
तेरे बगैर जीणा, चंगा नहियों लगदा, (२)
सारे असीं चाहिए दिन, ऐदां ही मनाईऐ, आ सजणा...

४. गुरु कृपाल बड़ा, खुश अज लगदा,
माता–पिता नूं दिन, शोभा दिंदा लगदा, (२)
वंडदा रहे दया कोई, बाकी न बचाईऐ, आ सजणा...

५. अजायब 'गुरमेल' ऐस, लायक ता नी लगदा,
जीव निमाणा वस, ओहदे वी नी लगदा, (२)
मन सजणा ओहदी, जिंदगी बणाईऐ, आ सजणा...

---

* रलके – एकत्र मिळून * फब्बदा – शोभून दिसतात



पवित्र हृदयाची कल्पना

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे ध्यान–अभ्यासाच्या कार्यक्रमा प्रारंभी संगतला दिलेला संदेश – संतबानी आश्रम, १६ पी एस राजस्थान

परमपिता परमात्मा सावन–कृपालजींच्या चरणी नमस्कार असो, ज्यांनी आपल्या गरीब आत्म्यावर दया करून त्यांच्या भक्तीचे दान दिले आणि भक्ती करण्याची आपणांस संधी दिली.



महाराज कृपाल नेहमी सांगत असत की ध्यान–अभ्यासात बसण्यापूर्वी तुम्ही परमात्मा प्राप्तीसाठी अंत:करणात तळमळ निर्माण करणारे भजन म्हणा. भजने ही परमात्मा प्रिय संतांचे लिखाण असते, त्यांच्या **पवित्र हृदयाची कल्पना** असते, भजनांमध्ये परमात्मा प्राप्तीची तळमळ व्यक्त केलेली असते. आपण अशा प्रकारचे प्रेम आणि तळमळ आपल्या अंत:करणात घेऊन ध्यान–अभ्यासात बसावे, जेणेकरून कर्ता–करविता परमात्मा आपल्या आत्म्याची आर्जव ऐकून आपल्यावर कृपेचा वर्षाव करेल. गुरू अर्जुनदेवजी सांगतात:

हर हर नाम जपेन्दया, कछु न कहे यम काल।
नानक मन तन सुखी होय, अन्ते मिले गोपाल।।

गुरू नानकदेवजी महाराज सांगतात,''जो मनुष्य प्रात:काळी उठून परमात्म्याच्या भक्तीमध्ये लीन होतो, परमात्म्याच्या नामात समरस होतो, तो मनुष्य अतिशय भाग्यशाली आहे.''

नानक भाग भले तिस जन के, जो हर चरणी चित्त लावे।

बंधू–भगिनींनो, आता तुम्ही डोळे मिटून ध्यान–अभ्यास आरंभ करा.

***

परमात्म्याची मर्जी

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू नानकदेवजी महाराजांची वाणी
संतबानी आश्रम, १६ पी एस राजस्थान

या अगोदर मी गुरूग्रंथ साहेबमधील वाणी **'राग गऊड़ी'** आणि **'सुखमनी साहेब'** यांवर सत्संग केला आहे. आपणां जीवांच्या हितासाठी संत–सतगुरूंनी जे काही लिहिले आहे, त्याचे वर्णन संतमताच्या सिद्धांतांनुसारच केले गेले असून त्याचा फायदा प्रेमीजन करून घेत आहेत. संतांच्या वाणीची प्रत्येक ओळ अन् ओळ मौल्यवान आणि आदरणीय असते.

मी रसल पर्किन्सला वचन दिले होते की गुरूग्रंथ साहेबमधील **'आसा जी दी वार'** या वाणीवर देखील मी सत्संग करेन. तुम्हांस कल्पना आहे की गेले काही महिने माझी प्रकृती ठीक नसल्याने मी ही सेवा करू शकलो नाही. आज मला आनंद होत आहे की माझी वचनपूर्ती करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. माझ्या गुरूदेवांच्या कृपेनेच हे कार्य मी करीत आहे. आशा करतो की माझे गुरूदेव माझ्यावर कृपा करतील, मला स्फुरण देतील आणि त्यांचे कार्य ते स्वत:च माझ्याद्वारे पूर्ण करवून घेतील.

आपण परमात्म्याचे ऋणी असावयास हवे, ज्याने आपणांस हे अनमोल रोगहीन शरीर दिले तसेच अनेक सुख–साधने उपलब्ध करून दिली.

या जगामध्ये रवाना करीत असताना परमात्म्याने आपणांस सांगितले होते,''मी तुम्हांला माझ्यापासून दूर धाडत आहे, परंतु सोबत माझ्याशी पुनर्मिलनाची संधीदेखील मी तुम्हांस देईन. धैर्याने जर तुम्ही मला पुन्हा भेटाल, तर मी तुमचे तेच घर तुम्हांला बक्षिसस्वरूपात परत देईन.'' संत–महात्मा आपणांस परमात्मा मिलनाचे साधन आणि पद्धत समजावून सांगतात. ते आपणांस हातावर हात ठेवून शांत बसून राहण्याची शिकवण देत नाहीत. कुणी आजारी असल्यास त्या आजारावर उपाय देखील असतो.

तुम्हाला कल्पना आहे की येथील सुरळीत जनजीवनासाठी सरकारने काही कायदे–नियम बनविले आहेत, तसेच ते कायदे छापून त्यांचे जनतेमध्ये प्रसारणदेखील केले आहे. त्यामध्ये नमुद केले आहे की चोरांस तसेच हत्या करणाऱ्यांस अमुक–अमुक कायद्याच्या कलमान्वये अमुक–अमुक सजा दिली जाईल. त्या कायद्यांची माहिती कुणीही मनुष्य प्राप्त करू शकतो. परंतु जर कुणी चोरी वा हत्या केल्यानंतर न्यायालयात जाऊन असे म्हटले की हा माझ्यावर अन्याय होत आहे, मला कायद्याचे ज्ञान नव्हते, तर त्यास सांगितले जाते, ''कायदे समजून घेणे तुझे कर्तव्य होते.''

कनिष्ठ न्यायालय जेव्हा एखाद्यास सजा करते, तेव्हा त्या सजेविरूद्ध तो मनुष्य उच्च न्यायालयात जाऊन अपील करतो. अनेकदा त्याने केलेली माफीची विनंती तेथे मंजूर होऊन त्याची सुटका होते. परंतु माफीचा अर्ज मंजूर होईलच असे प्रत्येकाच्या नशिबामध्ये नसते.

याचप्रमाणे सर्वांना ज्ञान मिळण्यासाठी परमात्म्याने त्यास प्रिय असलेल्या संत–महात्म्यांना या जगामध्ये पाठविले. त्या संत–महात्म्यांनी आत्म्यास लागू होणारे कायदे लपवून ठेवले नाहीत. त्यांनी त्यांच्या साहित्यामध्ये स्पष्टपणे नमुद केले आहे की प्रत्येक मनुष्याच्या कर्मांचा हिशोब ठेवण्यासाठी धर्मराज नामक एका खास देवाची नेमणुक केलेली आहे. धर्मराजास तुम्ही केलेल्या कर्मांची संपूर्ण माहिती असते.

त्यामुळे जर कुणी असे म्हटले की मला याची कल्पना नव्हती, तेव्हा धर्मराज त्यास विचारतो,''तू कुणा महात्म्याची वाणी वाचली नव्हतीस का, की कोणत्या कर्माची काय शिक्षा मिळते?'' याचप्रमाणे संत–महात्म्यांचे ग्रंथदेखील कायदेच आहेत, ज्यांना अनुसरून आपण जीवन जगल्यास आपण परमात्म्यास भेटू शकतो आणि आपल्या स्वगृही परतू शकतो.

सारंग नावाच्या राजास दोन राण्या होत्या. पहिल्या राणीने अस नावाच्या मुलास जन्म दिला होता. तो संतांची नित्यनेमाने सेवा करीत असे. दुसऱ्या

राणीला शार्दुल आणि खान सुल्तान नावाची दोन मुले होती. अस अतिशय सुंदर तरुण होता. त्याच्या रूपावर भाळून त्याच्या सावत्र आईच्या मनात काम–वासना निर्माण झाली. तिने ती असच्या समोर मांडल्यावर, त्याने व्यभिचार करण्यास नकार दिला. तो नकार ऐकल्यानंतर सूड भावनेने त्या राणीने राजास असे सांगत भडकविले की तुझ्या प्रिय मुलाने माझे सत्वहरण केले आहे. राजा सत्तेच्या नशेच्या आणि पत्नीच्या प्रेमाच्या आहारी गेला होता. कोणत्याही प्रकारचा शहानिशा न करता त्याने प्रधानास बोलावून आदेश दिला, ''असला शहरा बाहेर नेऊन त्यास फाशी देणाऱ्यां करवी ठार मारून त्याच्या शरीराचा एखादा अवयव पुरावा म्हणून मला आणून दाखव, जेणेकरून माझे समाधान होईल की असला मृत्युदंड दिला गेला.''

प्रधान असला घेऊन जंगलात गेला. त्याच्या अंतरात विचार आला की अस संतांची सेवा करणारा सज्जन आहे, त्याची हत्या करणे योग्य नाही. त्याने असचा एक हात कापून घेतला व त्यास विहिरीमध्ये ढकलून दिले. तो कापलेला हात राजास दाखवून प्रधान म्हणाला, ''आम्ही असची हत्या करून त्यास विहिरीत टाकून दिले.''

वंजारी लोकं भटकंती करत व्यापार करीत असतात. त्यांनी पाणी पिण्यासाठी त्या विहिरीमध्ये बादली सोडली. विहिरीमध्ये जिवंत असलेल्या असने आपला थोटा हात बादलीत अडकवला. तेव्हा त्या वंजारी लोकांच्या लक्षात आले की कुणी मनुष्य विहिरीत पडलेला आहे. त्यांना दया आली आणि त्यांनी असला विहिरीबाहेर काढले. त्या वंजारी लोकांनी असला एका धोब्यास विकून टाकले. अस दररोज कपडे बैलावर टाकून धोबीघाटावर नेत असे व स्वच्छ करून पुन्हा ते धोब्याच्या घरी आणत असे. सोबत तो परमात्म्याचे नामस्मरणही करीत असे.

ज्या नगरात अस राहत असे, त्या नगराच्या राजाचे निधन झाले. राजा निपुत्रीक असल्याने राजगादीसाठी कुणी वारसदार नव्हता. त्यामुळे मंत्रीमंडळाने

एक गुप्तपणे निर्णय घेतला की जो मनुष्य सकाळी सर्वप्रथम नगराजा दरवाजा उघडेल, त्यास राजाचा वारसदार म्हणून राजगादीवर बसवावे. अस रोज नित्य-नियमानुसार सकाळी कपडे बैलावर लादून धोबीघाटावर निघाला असता, त्यास नगराचा दरवाजा बंद असलेला दिसला. त्याने तो उघडला. दरवाज्यावरील पहारेकरी असला घेऊन मंत्रीमंडळाकडे गेले व त्यांना सांगितले की याने सर्वप्रथम नगराचा दरवाजा उघडला आहे. मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार त्यांनी असला नगराचा राजा बनविले. अस राजपुत्र होता, तसेच तो धर्मात्माही होता. त्यामुळे त्याने प्रजेची खूप काळजी घेत व्यवस्थित राज्यकारभार केला. प्रजेसाठी त्याने अन्न-धान्याचा खूप साठा केला.

त्याचवेळी राजा सारंगच्या राज्यामध्ये प्रचंड दुष्काळ पडला. परंतु राजा सारंग आणि त्याची मुले सुखोपभोगात दंग होते. अशा लोकांना प्रजेची चिंता नसते. राजा सारंगने प्रधानाला आज्ञा केली, ''कोठूनही अन्न-धान्य आण.''

धान्याचा शोध घेत-घेत प्रधान असच्या राज्यात आला. अस आता असराजा बनलेला होता. लोकं त्यास थोटाराजा असेही संबोधित असत. असने प्रधानास लगेच ओळखले. त्याचा आदर-सत्कार केला. त्यास विनामुल्य खूप अन्न-धान्यही दिले.

प्रधानाने परत येऊन त्याच्या राजास सर्व घटना सांगितली की तुमचा पुत्र असराज त्या राज्याचा अधिपती बनला आहे. तो महान धर्मात्मा मनुष्य असून त्याने आम्हांस विनामुल्य खूप धान्यही दिले आहे. राजा सारंगने जेव्हा त्याच्या मुलाची ही गाथा ऐकली, तेव्हा त्याने असराजला आमंत्रण पाठविले की त्याने येऊन राजास भेटावे, तो असला राज्य देऊ इच्छितो. असराज त्याचा फौजफाटा घेऊन मोठ्या थाटात त्याच्या वडिलांना भेटण्यासाठी गेला. हे कळल्यावर त्याच्या सावत्र बंधुंच्या, शार्दुल व खान सुल्तानच्या हृदयात द्वेषाग्नी प्रज्वलीत झाला. त्यांनी असराजशी युद्ध पुकारले. तेथेही थोट्या असराजचा विजय झाला. त्याने तेथेही धर्म-राज्य स्थापित केले.

गुरू अर्जुनदेवजी महाराजांनी अतिशय प्रेमाने धर्मात्मा असराजाच्या गोष्टीचा समावेश गुरूग्रंथ साहेबमध्ये केलेला आहे. या गोष्टीचे तात्पर्य असे आहे की आपण नेहमी पवित्र जीवन जगावयास हवे, सुखं आणि दु:खं या दोन्ही स्थितींमध्ये सदैव परमात्म्याचे चिंतन करावयास हवे. जीवन पवित्र असणाऱ्या तसेच सतगुरूंवर विश्वास असणाऱ्या मनुष्याचा सदा-सर्वदा विजय होत असतो. परमात्म्याने सतगुरूंना इतक्या शक्ती प्रदान केल्या आहेत की त्यांचे वर्णन केले जाऊ शकत नाही.

सतनामाचा उपदेश करीत करीत गुरू नानकदेवजी महाराज रावी नदीच्या किनारी पोहचले, नंतर तेथे करतारपूर बेदिया नावाचे गाव वसले. तेथील एक दुकानदार दररोज पहाटे तीन वाजता नदी पार करून गुरू नानकदेवजींचे दर्शन करण्यासाठी येत असे. गुरू नानकदेवजींचे पवित्र दर्शन करून तो स्वत:च्या आत्म्यावरील पापांचा मळ स्वच्छ करीत असे आणि त्यानंतर नदीमध्ये स्नान करून ध्यान-अभ्यासासाठी बसत असे.

एकदा स्नान करण्यासाठी त्या दुकानदाराने नदीत बुडी मारली असता, त्या नदीतील मगरीने त्यास गिळून टाकले. एका कोळ्याने मासे पकडण्यासाठी नदीमध्ये जाळे टाकले. त्या जाळ्यामध्ये लहान माशांसोबत ती मगरदेखील अडकली. जड झालेले जाळे पाहून कोळी आनंदीत झाला की आज दैव उदयास आले, या माशांची विक्री करून भरपूर पैसे मिळतील.

घरी पोहचल्यावर कोळ्याने मगरीचे पोट फाडले असता, त्यास पोटात बेशुद्ध अवस्थेत एक मनुष्य आढळला. त्या मनुष्याच्या शरीरावर एक साधा ओरखडादेखील नव्हता. त्या मनुष्यास अंघोळ घातली असता, तो शुद्धीवर आला. परंतु त्यास त्याच्या पूर्व जन्माचा विसर पडला होता. कोळ्यास मुलबाळ नव्हते. त्यामुळे तो कोळी आनंदीत झाला. त्याने विचार केला की परमात्म्याने माझ्यावर अपार कृपा केली आहे, कोणत्याही कष्टाशिवाय मला तरुण मुलगा लाभला आहे.

तो कोळी श्रीमंत होता. त्याने त्या तरुणाचा विवाह एका मोठ्या घराण्यातील मुलीशी केला. त्याच्या घरी दोन मुले व दोन मुली जन्मास आल्या. त्या तरुणाच्या पहिल्या पत्नीस देखील दोन मुले व दोन मुली होत्या. त्याच्या पहिल्या पत्नीने आणि तिच्या मुलांनी त्या तरुणास शोधण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु तो सापडला नाही म्हणून त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रारही नोंदविली होती. अखेरीस काहीच हाती न लागल्याने **परमात्म्याची इच्छा** मानून ते शांत राहिले.

एकदा तेथे जत्रा लागली होती. तो तरुण त्याची पत्नी आणि मुलांसोबत त्या जत्रेमध्ये गेला. त्याचवेळी त्या जत्रेत त्याची पहिली पत्नीदेखील आली होती. तिने तिच्या पतीस ओळखले. त्याचा हात पकडून ती म्हणाली, ''हे प्रिय पतीदेव! इतके दिवस तुम्ही कोठे होतात?'' एखाद्या वाघिणीप्रमाणे दुसरी पत्नी पहिल्या पत्नीच्या अंगावर धावून जात म्हणाली, ''माझ्या पतीवर हक्क सांगणारी तू कोण माझी सवत लागून गेलीस?'' त्या दोघींची बाजू त्यांच्या दृष्टीने पहाता बरोबर होती.

दोघीजणी त्यांची तक्रार घेऊन त्या नगराच्या मुख्याधिकाऱ्याकडे गेल्या. परंतु तेथे त्यांचा न्याय-निवाडा काही झाला नाही. तेथून त्या न्यायालयामध्ये गेल्या तेथीलही न्यायाधिश त्यांचा गुंतागुंतीचा प्रश्न सोडवू शकला नाही. अखेरीस एकाने त्यांना गुरू नानकदेवजींकडे जाण्याचा सल्ला दिला. तो म्हणाला की, गुरू नानकदेवजी रावी नदीच्या किनारी बसलेले असून, तेच यातून काही मार्ग काढू शकतील.

दोन्ही स्त्रिया गुरू नानकदेवजींकडे गेल्या व त्यांनी त्यांच्या अंत:करणातील दु:ख गुरू नानकदेवजींसमोर मांडले. त्यावर गुरू नानकदेवजी हसत म्हणाले, ''मुलींनो! तुम्ही दोघी जणीही आप-आपल्या ठिकाणी बरोबर आहात. आपण परमात्म्याची परवानगी घेऊया. जर त्याची आज्ञा झाली तर तुमचा न्याय-निवाडा नक्कीच होईल.'' पुढे गुरू नानकदेवजी म्हणाले, ''तुमच्यापैकी

एकीने पतीच्या उजव्या बाजूस तर दुसरीने डाव्या बाजूस जाऊन उभे राहून त्याचा हात पकडा आणि परमात्मारूपी अकाल पुरुषावर विश्वास ठेवून तुमच्या पतीस आप-आपल्या बाजूस खेचा.''

त्या दोन्ही स्त्रियांनी त्या तरुणास आप-आपल्या बाजूस ओढले असता, त्या तरुणाचे दोन तरुण तयार झाले. मग दोघी जणीही आनंदीत होऊन तेथून निघून गेल्या. ज्या गोष्टीचा न्याय-निवाडा या जगातील न्यायालय करू शकले नाही, त्याचे निरसन संतांनी त्यांच्या कृपादृष्टीने केले.

अशा अनेक घटनांचा संग्रह संतमताच्या इतिहासात आढळतो. संतांच्या अंतरात स्वत:ची शक्ती ठेवून परमात्मा कार्य करीत असतो. परमात्मा पुरुषास नारी तर नारीस पुरुष करू शकतो. तो समुद्राच्या ठिकाणी जमीन व जमीनीच्या ठिकाणी समुद्र करू शकतो. तो अतिशय निर्बंध आहे.

हत्या करणाऱ्यापेक्षा रक्षक हा सदैव श्रेष्ठ असतो. इब्राहिमला जेव्हा पेटत्या विस्तवावरून चालावयास लावले, तेव्हा त्या विस्तवाचे रूपांतर फुलांमध्ये झाले. भक्त प्रल्हादास घेऊन जेव्हा त्याची जादुगारीण आत्या अग्नीत बसली, तेव्हा देखील सकल जगाच्या कर्ता-करवित्या परमात्मारूपी गुरूंनी प्रल्हादाचे रक्षण केले. कुणाचेही रक्षण करत असता परमात्मा उशीर करीत नाही, परंतु तेथे प्रश्न असतो तो आपल्या श्रद्धेचा, प्रेमाचा आणि विश्वासाचा. कबीर साहेब सांगतात:

जाँको राखे साईयाँ मार सके ना कोए।
बाल ना बाँका कर सके, जे जग बैरी होए।।

आसा जी दी वार मधील वाणी जास्त करून गुरू नानकदेवजींचीच आहे. गुरू अंगददेवजींच्याही काही वाणी त्यात आहेत. सर्व संतांनी त्यांच्या वाणीमध्ये तीन मुख्य गोष्टी नमूद केलेल्या आहेत. सतगुरूंशिवाय नाम प्राप्त होत नाही, नामाशिवाय मुक्ती मिळत नाही आणि सत्संगाशिवाय आपण आपल्या चुका सुधारू शकत नाही.

बलिहारी गुर आपणे दिउहाड़ी सद वार।।
जिनि माणस ते देवते कीए करत न लागी वार।।

सुफी संत शेख फरीद नामाची खूप कमाई करणारे संत होते. गुरूग्रंथ साहेबमध्ये त्यांच्याही वाणीचा समावेश आहे. त्यांच्या मुलाचे नाव शेख बरम होते, जो त्यांच्यानंतर त्यांच्या गुरूगादीचा वारसदार बनला. गुरू नानकदेवजींना शेख बरमने अनेक प्रश्न विचारले होते. त्यांचे उत्तर देत असताना गुरू नानकदेवजींनी वर्णन केले की सतगुरू–शक्ती म्हणजे काय असते? सतगुरू जीवांना कशा–कशा प्रकारे मदत करतात? ज्याने खडीसाखर चाखलेली आहे तोच खडीसाखरेच्या मधुर स्वादाचे अचूक वर्णन करू शकतो. ज्यास सतगुरूंपासून काहीतरी लाभले आहे, तोच सतगुरूंविषयी सांगू शकतो.

शेख बरमला गुरू नानकदेवजी सांगतात, ''माझ्या प्रत्येक श्वासा–श्वासाला मी सतगुरूंना स्वत:चे सर्वस्व अर्पण करतो. सतगुरूंनी माझ्या राक्षसबुद्धीचे देवबुद्धीमध्ये रूपांतर केले. मी मार्गावरून भटकलेलो होतो, सतगुरूंनी मला परमात्म्याशी जोडले, माझे जीवनच बदलून टाकले.''

जे सउ चंदा उगवहि सूरज चड़हि हजार।।
एते चानण होदिआं गुर बिनु घोर अंधार।।

आता आपण सांगता, ''हे बघ बंधू शेख बरम! या विश्वमंडळामध्ये एक सूर्य आणि एक चंद्र आहे, जे सर्व विश्व प्रकाशमान करीत आहेत. परंतु सत्य हेच आहे की अशा प्रकारचे लाखो सूर्य आणि चंद्रदेखील आपल्या अंतरातील अज्ञानरूपी अंध:कार नाहीसा करू शकत नाहीत. केवळ सतगुरूच तो अंध:कार दूर करू शकतात.''

परमात्मा जरी आपल्या अंतर्यात असला तरी आपण स्वत:हून त्यास भेटू शकत नाही. हे काम केवळ परमात्म्याच्या वतीने या जगामध्ये आलेले महात्माच करू शकतात, कारण ते परमात्म्याशी जोडलेले असतात.



नानक गुरू न चेतनी मनि आपणै सुचेत।।
छुटे तिल बुआड़ जिउ सुंणे अंदरि खेत।।
खेतै अंदरि छुटिआ कहु नानक सउ नाह।।
फलीअहि फुलीअहि बपुड़े भी तन विचि सुआह।।

आपण सांगत आहात की, ज्या लोकांना परिपूर्ण सतगुरूंद्वारे नाम प्राप्त झालेले नसते, ते लोक विचार करतात की सतगुरूंची आपणांस काय गरज? अशी माणसे तीळाच्या त्या रोपाप्रमाणे असतात, ज्या रोपांस फुले तर येतात, परंतु त्यांच्या शेंगांमध्ये तीळ नसतात. शेतकरी अशा रोपांना शेतामध्येच सोडून देतात, कारण घरी आणून त्यांचा काहीच उपयोग होणार नसतो. अशा रोपांना जनावरेदेखील खात नाहीत.

अशाच प्रकारे मनमुख मनुष्यास मुले-मुलीही असतात. ते निरोगी देखील असतात व मौजदेखील करतात. परंतु परमात्म्याच्या दरबारात या मनमुख लोकांची किंमत, त्या निरूपयोगी तीळाच्या रोपट्या एवढीच असते. त्या जीवनानंतर त्या मनमुखांना परमेश्वर त्याच्या घरामध्ये प्रवेश देत नाही.

आपीन्है आपु साजिओ आपीन्है रचिओ नाउ।।
दुयी कुदरति साजीऐ करि आसणु डिठो चाउ।।

आपण सांगत आहात, ''या विश्वाची रचना परमात्म्याने केलेली आहे. पशु, पक्षी आणि मनुष्य, या सर्व योनींची निर्मितीही परमात्म्यानेच केलेली आहे. या विश्वाची निर्मिती करून परमात्मा स्वत: पाहत आहे की ते कसे चालत आहे? कोण काय काय करीत आहे?''

दाता करता आपि तूं तुसि देवहि करहि पसाउ।।
तूं जाणोई सभसै दे लैसहि जिंदु कवाउ।।

आपण सांगता,''हे परमात्मा! तू स्वत:च देह धारण करून जीवांना सजवतोस, तूच त्यांच्या देहामध्ये जीवनाचा संचार करतोस, त्या शक्तीच्या मदतीनेच जीव हालचाल करीत असतात. हे सर्वकाही तूच करत आहेस.''

करि आसणु डिठो चाउ।। करि आसणु डिठो चाउ।।

गुरू नानकदेवजी महाराज सांगत आहेत, ''ज्या शक्तीने या विश्वाची निर्मिती केलेली आहे, ती शक्ती शाश्वत आहे. ती काळाच्या परिघामध्ये येत नाही. या विश्वाची रचना रचून त्याची देखरेखही परमात्मा स्वत: करीत आहे. मनुष्य जसे कर्म करतो, त्यानुसार त्यास त्याचे फळ प्राप्त होते. याचा समज आपणांस सतगुरूंच्या कृपेनेच होऊ शकतो.''

कुणाची सतगुरूंशी गाठ घालून द्यावी, कुणाला नाम द्यावे, कुणाद्वारे या जन्मात नामाची कमाई करवून घ्यावी, या सर्व गोष्टींचा निर्णय परमात्मा स्वत: करतो. आपण जेव्हा नामाची कमाई करून अंतर्यात जातो, तेव्हा आपणांस आकलन होते की परमात्म्याची शक्ती सर्वत्र कार्यरत असून तो कणा-कणात व्यापलेला आहे.

***

प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
संतबाणी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान

एक प्रेमी: *काही आई–वडिलांनी प्रश्न विचारला आहे की त्यांनी त्यांच्या मुलांचे संगोपन संतमताच्या शिकवणुकीनुसार कसे करावे? धार्मिक रिती–रिवाजानुसार त्यांची वर्तणुक कशी असायला हवी? अडचण अशी आहे की अनेक मुले नामदान प्राप्त झाल्यानंतर, जोपर्यंत ते आपल्या घरी असतात, तोपर्यंत त्यांच्यावर संतमताचा व्यवस्थित प्रभाव असतो. परंतु जेव्हा ते शाळेत जाऊ लागतात, तेव्हा त्यांच्या देशातील धर्मानुसार त्यांना शिक्षण मिळते, ज्यामुळे ती मुले गोंधळून जातात. अखेरीस त्याच्या परिणामस्वरूप मुले संतमत सोडून देतात. यावर काय उपाय आहे?*

बाबाजी : ही बाब अतिशय गुंतागुंताची आहे. प्रत्येक आई–वडिलांची हीच अडचण आहे कारण मुलांच्या जीवनास योग्य रितीने साकार करणारे आई–वडिलच असतात. ज्या घराचा पाया भर–भक्कम असतो, त्या घराची पडझड लवकर होत नाही. त्याचप्रमाणे संतमताच्या शिकवणीचा ठसा मुलाच्या अंतरामध्ये योग्य रितीने उमटवल्यास, त्याचा भरपूर फायदा ते मुल शाळेत गेल्यानंतरही होतो. शाळेत मुलास दाखल केल्यानंतर मुला प्रती पालकांनी बेफिकीर होऊ नये. मुलाची योग्य रितीने देखभाल करत रहावी.

सर्वात उत्तम सल्ला असा आहे की जेथे सत्संगींचा ग्रुप आहे वा एखादा आश्रम आहे, तेथे सत्संगींनी एकत्र येऊन शाळा सुरू करावी, त्यामुळे सत्संगींच्या मुलांचे जीवन खूप चांगले बनू शकते. मुलांना यथा–योग्य शिक्षण मिळू शकेल. जे सत्संगी शिक्षक म्हणून इतर शाळांमध्ये मुलांना शिकविण्यास जातात, त्यांस जर तितकेच वेतन देऊन अशा शाळेत सत्संगींच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी ठेवले तर त्याचा मुलांना खूप फायदा होईल, मुलांचे भवितव्य उज्वल होईल.

कॅनडामध्येदेखील प्रेमींनी कृपाल आश्रमामध्ये शाळा सुरू केली आहे, जेथे सत्संगींची मुले लाभ उठवितात. अमेरिकेतही अनेक ठिकाणी अशा शाळा सुरू केल्या गेल्या आहेत. संतबानी आश्रमातील शाळेची तुम्हांला माहिती आहेच की त्या शाळेची उत्तरोत्तर प्रगती होत आहे. याचप्रमाणे कोलंबियामधील संगतनेही याकडे लक्ष देऊन प्रेम-भावाने शाळेची सोय करावी, जेणेकरून सत्संगींच्या मुलांना त्याचा फायदा होईल.

गेल्या दौऱ्यामध्ये मी कॅनडामध्ये गेलो असता, तेथील शाळेस परवानगी दिली होती. कृपाल आश्रमात प्रेमींनी शाळा सुरू केली असून जिचा भरपूर लाभ तेथील सत्संगींच्या मुलांना होत आहे. मला वाटते की डॉक्टर मोलिनो यांनी स्वत: या गोष्टीवर लक्ष द्यावयास हवे, त्यासाठी प्रेमींना प्रेरीत करावयास हवे, जेणेकरून मुलांना अशा प्रकारचा त्रास होऊ नये. कारण मुले मोठी होऊन जेव्हा युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षणासाठी जातील, तेव्हा त्यांच्या जीवनाचा पाया पक्का झालेला असेल. त्यामुळे जेवढी अडचण लहान मुलांना येते, तेवढी अडचण या मुलांना येणार नाही.

मी अपेक्षा करतो की येथून परत गेल्यानंतर जेव्हा बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची मिटींग घ्याल, त्या मिटींगमध्ये हा प्रस्ताव मांडून त्याचा मोकळेपणाने विचार करा. सर्वजण मिळून हा प्रस्ताव यशस्वी करण्याचा प्रयत्न करा.

एक प्रेमी : *आम्ही जेव्हा ध्यान–अभ्यासात बसतो तेव्हा दोन्ही नेत्रांच्या मध्यभागी लक्ष एकाग्र करणे गरजेचे असते. लक्ष एकाग्र करण्यासाठी काही उत्तम उपाय आहे का?*

बाबाजी: ध्यान–अभ्यासासाठी जेव्हा मी तुम्हाला बसवतो, तेव्हा हेच सांगतो की तुम्ही शांत मनाने ध्यान–अभ्यासात बसा. शांत म्हणजे तुमच्या अंतरमनात या संसारामधील कोणतेही संकल्प–विकल्प उठू नयेत. ध्यान–अभ्यासात बसल्यानंतर तसेच इतर वेळीही चालता–फिरताना तुमचे लक्ष तिसऱ्या तिळावर एकाग्र असले पाहिजे. तिसऱ्या तिळाशी आपला अतिशय जवळचा संबंध असून, ते आपल्या आत्म्याचे आसन आहे.

एक प्रेमी : *काल तुम्ही सांगितले होते की जे संत उच्च मंडळामध्ये जातात, तेच परमेश्वराचे दर्शन करू शकतात. परंतु आम्ही त्या उच्च मंडळांमध्ये न जाताही परमेश्वराचे दर्शन घेत आहोत.*

बाबाजी : मला अतिशय आनंद होत आहे. मी काल देखील हेच म्हटले होते की संत आणि परमेश्वरात काहीच फरक नसतो. कबीर साहेब सांगतात:

हमरो भर्ता बड़ो विवेकी आपे सन्त कहावे।

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

साध रूप अपना तन धारया।

एक प्रेमी : *आमच्याकडे एखादे मुल असे आले की ज्याची आई नामधारी आहे परंतु वडील मात्र नामधारी नाहीत. अशा मुलाच्या जीवनाचा पाया आम्ही कशा रितीने मजबूत करावा? आम्हांला स्वत:लाच जर संतमताचे ज्ञान नाही तर इतरांना आम्ही काय समजून सांगावे?*

बाबाजी : मी तुम्हाला अगोदरच सांगितले आहे की तुम्ही नीट विचार करूनच प्रश्न विचारा. सत्संगीला तर संतमताची पूर्ण माहिती दिली जाते. त्यामुळे त्यास संतमताचे पूर्ण ज्ञान असते. सत्संगीला संतमताचे पूर्ण ज्ञान असते, तर मग तो इतरांना का बरे समजावून सांगू शकणार नाही?

***



दर्शनाची ओढ

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, कबीर साहेबांची वाणी
सिली–टिलार्ड, फ्रान्स – १५ जून, १९९४

परमात्मा गुरूदेव सावन–कृपालजींच्या चरणी वंदन करतो ज्यांनी आपणांस त्यांची स्तुती करण्याची संधी दिली. जेव्हा शिष्य नामस्मरणाद्वारे शरीराची नऊ द्वारे रिक्त करून नेत्रांच्या मधोमध असलेल्या दशम द्वारापर्यंत पोहचतो आणि गुरूंच्या तेजस्वी स्वरूपास अंतर्यात प्रगट करून घेतो, तेव्हा त्यास आपल्या गुरूंची आंतरिक मंडळातील महानता समजते की खरोखरीच आपले गुरू किती उच्चकोटीचे आहेत!

हे समजल्यानंतरच शिष्यास कळते की त्याचे गुरू अंतर्यामी असून ते प्रत्येक जीवाचे अंत:करण जाणतात. तेव्हा तो आपल्या गुरूंपुढे विनंती करतो की, ''हे गुरूदेव, मी जी काही वाईट कर्मं करतो, आपण ते सर्व जाणता. मी सांसारिक लोकांपासून आपली सर्व वाईट कर्मं लपवून ठेवतो परंतु तुमच्यापासून माझे कोणतेही वाईट कर्मं लपलेले नाही.''

त्यावेळी शिष्याच्या हृदयातून गुरूचरणी खरी विनंती निघते की,''माझ्या कर्मांचा हिशोब घेण्याअगोदरच मला माफ करा. मी मनाच्या सांगण्यावरून अनेक वाईट कर्मं केलेली आहेत. मनाने मला भ्रमविले, मी विषय–विकारांच्या जंगलात इथे–तिथे भटकत राहिलो, परंतु तुम्ही क्षमस्वी आहात. तुम्ही माझ्या दुष्कर्मांच्या व अपराधांच्या यादीचा कागद ज्यात माझ्या वाईट कर्मांचा हिशोब लिहीलेला आहे, तो पाहण्याआधीच मला माफ करा.''

परमात्मा कृपालजींनी या गरीब आत्म्यावर जेव्हा आपल्या दयेचा वर्षाव केला तेव्हा या गरीब आत्म्याच्या अंत:करणातून हीच विनंती निघाली की, ''मी तिळा–तिळाचा अपराधी आहे, कणा–कणाचा चोर आहे. मी पावलो–पावली चूका केलेल्या आहेत. आता हेच बरे होईल की तुम्ही माझे अवगुण

पाहू नका, तुम्ही माझ्या दुष्कर्मांच्या यादीचा कागद पाहण्याआधीच, माझ्या कर्मांचा हिशोब घेण्यापूर्वीच मला क्षमा करा.''

महाराज सावन सिंहजी सदैव सांगत असत की,''शिष्य गुरूंना तोपर्यंतच प्रश्न विचारत रहातो जोपर्यंत तो अंतर्यात जाऊन अंतर्यातील गुरूंची महानता समजत नाही. जेव्हा शिष्यास जाणीव होते की माझे गुरू अंतर्यामी आहेत, ते माझे प्रत्येक कर्म जाणतात, तेव्हा शिष्याच्या हृदयात निर्माण होणारे सर्व प्रश्न समाप्त होतात. त्यानंतर जेव्हा तो गुरूंकडे जातो तेव्हा तो निशब्द होतो. त्यास कळून चुकते की माझे गुरू सर्व काही जाणतात.''

परमपिता कृपालजींच्या दयेने ग्रुपमधील अनेक प्रेमी जेव्हा हिंदुस्थानात येतात तेव्हा ते म्हणतात की आम्ही आमच्या देशातून जेव्हा निघालो होतो तेव्हा आमच्या मनात अनेक प्रश्न उभे राहिले होते, परंतु येथे आल्यानंतर आमचे कोणतेही प्रश्न बाकी राहिले नाहीत. तुम्ही आम्हांस थोड्या वेळासाठी फक्त तुमचे दर्शन करू द्या.

जेव्हा मी विदेशात जातो तेव्हा अनेक लोक माझ्या वैयक्तिक भेटीसाठी येतात. सर्वांच्या मनात प्रश्न असतातच असे नाही. जास्तकरून प्रेमी केवळ मला शांतपणे पाहू इच्छितात. जेव्हा आपणा असमंजस जीवांना समजते की गुरूंच्या गप्प रहाण्यामागे काय गुपित आहे, तेव्हा आपण फक्त गुरूंच्या भोळ्या-भाळ्या व निरागस चेहऱ्याकडे पहात राहू इच्छितो.

जेव्हा एखादा सच्चा शिष्य ध्यान-अभ्यासाद्वारे आपल्या आत्म्यावरून स्थूल, सुक्ष्म आणि कारण हे तीनही पडदे दूर सारतो, तेव्हा तो सांसारिक इच्छा-आकांक्षा पलिकडे जातो. त्यानंतर त्यास कोणतीही सांसारिक गोष्ट नकोशी होते. तेव्हा तो केवळ गुरूंच्या सुंदर आणि मनमोहक स्वरूपासाठीच तळमळतो, त्यास सदैव गुरूंच्या तेजस्वी स्वरूपाच्या दर्शनाचीच इच्छा असते. शिष्याची स्थिती त्या माशाप्रमाणे होते जो पाण्याशी प्रेम करतो. माशास पाण्याबाहेर काढल्यास तो तडफडून मरतो, त्याचप्रमाणे शिष्य सदैव

गुरूंना पाहूनच जीवित असतो, जेव्हा त्यास गुरूंचे मनमोहक स्वरूप दृष्टीस पडत नाही तेव्हा त्यास वाटते की त्याचा मृत्यु झालेला आहे. एका क्षणासाठी देखील तो गुरूंच्या दर्शनापासून वंचित राहू इच्छित नसतो.

प्रियजनहो, संत-सतगुरू जेव्हा शिष्यास शब्द-नामाचे दान देतात, तेव्हा ते आपले तेजस्वी शब्द स्वरूप सेवकाच्या अंतर्यात ठेवतात, जे शांत व प्रकाशमय स्वरूप असते. गुरू अभूल (ज्याकडून कधीही चूक होत नाही) असतात. त्यांचे स्वरूप सदैव सेवकाचे मार्गदर्शन करते. सेवक जेव्हा त्या स्वरूपास अंतर्यात प्रगट करून घेतो, तेव्हा विषय-विकारांच्या आगीत पेटलेले मन शांत होऊन थंड बर्फाप्रमाणे शीतल बनते.

परमात्मा सावन अनेकदा आपल्या सत्संगात अमीर खुसरोची गोष्ट सांगत असत की अमीर खुसरो मुल्तान सूबे येथील एका वैद्याचा नोकर होता. एका गोष्टीवरून त्याचा वैद्याशी मतभेद झाला, म्हणून त्याने कामावरून निवृत्ती घेतली व आपले निवृत्तीधन (त्याकाळी चांदीचे चलन प्रचलित होते) ऊंटावर लादून दिल्लीच्या दिशेने जाऊ लागला. दिल्लीत त्याचे प्रिय गुरू निजामुद्दीन औलिया रहात असत.

निजामुद्दीन औलियाचा एक गरीब शिष्य होता ज्यास आपल्या मुलीचे लग्न करावयाचे होते. त्या शिष्याच्या मनात विचार आला की आपण पीर निजामुद्दीन औलियाकडून काहीतरी मागून आणावे. त्याने निजामुद्दीन औलियाकडे जाऊन विनंती केली की,''मला आपल्या मुलीचे लग्न करावयाचे आहे, त्यामुळे तुम्ही माझी काहीतरी मदत करा.'' निजामुद्दीन औलिया म्हणाले,''तू माझ्याजवळ बस, आज जे काही दान-नैवेद्यरूपात धन गोळा होईल ते तू घेऊन जा.'' परमेश्वराच्या मर्जीनुसार त्या दिवशी दानरूपात काहीही धन गोळा झाले नाही. निजामुद्दीन औलिया म्हणाले, आणखी एक दिवस वाट पहा. परंतु त्या दिवशी देखील काहीही दानरूपात मिळाले नाही. तिसऱ्या दिवशीदेखील वाट पाहीली परंतु तरीही दान मिळाले नाही.

जेव्हा तो शिष्य निराश होऊ लागला तेव्हा निजामुद्दीन औलिया म्हणाले,''प्रिय शिष्या, माझ्याकडे या चप्पलांखेरीज काहीही नाही, तू हा चप्पलांचा जोडाच घेऊन जा.'' त्या शिष्याने खिन्न व उदास मनाने त्या चप्पला उचलल्या. तो शिष्य त्या चप्पला घेऊन जाऊ लागला. थोड्या अंतरावर समोरून अमीर खुसरो आपल्या गुरूंच्या दर्शनासाठी येत होता. अमीर खुसरोला सुगंध येऊ लागला. जसजसा तो शिष्य अमीर खुसरोच्या जवळ येऊ लागला तसतसा सुगंध वाढत गेला. जेव्हा तो शिष्य त्याच्या जवळून पुढे गेला तेव्हा तो सुगंध अमीर खुसरोच्या मागून येऊ लागला. अमीर खुसरो समजून चुकला की हा सुगंध या मनुष्यातूनच येत आहे, या मनुष्याकडेच काहीतरी अलौकिक वस्तू आहे.

अमीर खुसरोने त्या मनुष्यास विचारले की,''तू कुठून येत आहेस आणि तुला कुठे जायचे आहे?'' त्याने उत्तर दिले,''मला आपल्या मुलीचे लग्न करावयाचे आहे म्हणून मी निजामुद्दीन औलियांकडे गेलो होतो की ते माझी काहीतरी मदत करतील, परंतु फकीर तर स्वतःच उपाशी असून त्यांनी फाटकी वस्त्रं घातलेली असतात. जर परमेश्वरानेच काही धन दिले नाही तर मग फकीर काय देऊ शकतील?'' अमीर खुसरोने त्यास विचारले की,''त्यांनी तुला काही दिले आहे का?'' त्यावर तो म्हणाला,''त्यांनी मला आपल्या चप्पला दिल्या आहेत.'' अमीर खुसरोने त्यास विचारले,''तुला या चप्पलांच्या मोबदल्यात काय हवे?'' तो म्हणाला,''तुला जे योग्य वाटेल ते दे.''

अमीर खुसरो म्हणाला,''मी तुला या चप्पलांचे मुल्य तर देऊ शकत नाही, त्या माझ्यासाठी अमुल्य आहेत कारण त्या माझ्या गुरूंच्या पवित्र चरणांना लागून राहिलेल्या आहेत. परंतु माझ्या आर्थिक योग्यतेनुसार जे जमेल ते मी तुला देतो.'' अमीर खुसरोने आपल्या मुलाबाळांच्या पालपोषणा करीता धनाने लादलेला एक उंट ठेऊन बाकी सर्व उंटांवर लादलेली संपूर्ण जीवनातील कमाई त्या माणसास दिली. अमीर खुसरोने आपल्या गुरूंच्या

चप्पला उचलून आपल्या मस्तकावर ठेवल्या आणि आपल्या गुरूंकडे जाऊन म्हटले,''आपण या चप्पला परिधान कराव्यात.''

निजामुद्दीन औलियांनी अमीर खुसरोला विचारले,''तू या चप्पला कुठून घेतल्यास?'' अमीर खुसरोने रस्त्यातील पूर्ण घटनेचा वृत्तांत सांगितला. निजामुद्दीन औलियांनी विचारले की,''तू या चप्पलांच्या जोड्याची किती किंमत दिलीस?'' अमीर खुसरो म्हणाला,''मी या जोड्यांची किंमत देऊ शकत नाही, परंतु माझ्याकडे जे काही होते ते मी त्यास दिले.'' निजामुद्दीन औलियांनी अमीर खुसरोला छातीशी धरले आणि प्रेमाने म्हटले,''इतके देऊनही तुला या चप्पला स्वस्तात मिळाल्या.'' शेवटी अमीर खुसरोचे प्रेम पाहून निजामुद्दीन औलिया म्हणाले,''अंतसमयी अमीर खुसरोची कबर माझ्या कबरीच्या जवळ बनवू नका कारण जर तुम्ही तसे केलेत तर माझी कबर दुभंगली जाईल. जेव्हा शिष्याच्या अंत:करणात गुरू प्रेम जागृत होते तेव्हा शिष्य कोणतीही सांसारिक वस्तू मागण्यास तयार नसतो. तो गुरूंकडे गुरूंनाच मागतो, गुरूंचे प्रेमच मागतो.

प्रीत लगी तुम नाम की, पल बिसरै नाहीं।
नजर करो अब मिहर की, मोहिं मिलो गुसाईं।।

कबीर साहेब अत्यंत प्रेमाने सांगतात,''आता माझे प्रेम तुम्ही दिलेल्या नामाशी जडलेले आहे. नामाशी प्रेम तेव्हाच जडते, नामदान घेण्याची इच्छा अंतरात तेव्हाच निर्माण होते जेव्हा सकलजगाचा मालक परमात्मा सचखंडात हा निर्णय घेतो की हा आत्मा खूप भटकून थकलेला आहे. अनेक जन्मांपासून हा आत्म्या पशू-पक्षांच्या योनीत जन्म घेऊन भटकत राहिला व शेवटी जेव्हा मनुष्यजन्म मिळाला तोदेखील त्याने सुख-शांतीने व्यतीत केला नाही. तो मनुष्यजन्मातही विषय-विकारांच्या जंगलात दु:खं-अडचणींच्या कचाट्यात सापडून भटकत राहिला. जेव्हा परमात्मा जन्म-मृत्युच्या चक्रात भटकणाऱ्या आत्म्यावर दया करतो तेव्हा तो त्याआत्म्याच्या हृदयात नामदान प्राप्त

करण्याची इच्छा निर्माण करतो व त्या आत्म्याची भेट अशा संत–महात्म्यांशी करवितो जे नामस्मरण करून नामरूपच झालेले असतात.''

परमात्मा सावन सांगत असत,''हे पूर्वनिश्चित असते की या आत्म्यास परिपूर्ण गुरू भेटतील का नाही? याचा गुरूंवर श्रद्धा–विश्वास बसेल का नाही? हा नाम घेऊन कमाई करेल का ते काम पुढल्या जन्मावर सोडेल?''

कबीर साहेब सांगतात, ''माझे नामाशी अशाप्रकारचे प्रेम जडले की आता मी उठता–बसता, निद्रावस्थेत–जागृतावस्थेत नामास विसरू शकत नाही. निसर्गाचा नियम आहे की ज्याव्यक्तीशी आपले प्रेम असते, त्यांची आठवण न काढता देखील त्यांचा चेहरा आपल्या नजरेसमोर येतो.''

माशाचे पाण्याशी प्रेम असते. जेव्हा त्यास मच्छिमार पकडतो तेव्हा तो माशास मसाले लावून विस्तवावर भाजतो. परंतु मासा ज्या व्यक्तीच्या पोटात जातो तेथेदेखील मासा आपले पाण्यावरील प्रेम सोडत नाही. मासा खाणाऱ्या व्यक्तीस जास्त तहान लागते. त्याच्या पोटात गेल्यानंतरही मासा आपले पाण्यावरील प्रेम जाहिर करतो.

नजर करो अब मिहर की, मोहिं मिलो गुसाईं।।

तू स्वत:हूनच प्रेम जडविलेस, नामाशी जोडलेस. आम्ही कलियुगातील मार्ग चुकलेले जीव तुम्ही दिलेल्या नामाची महानता काय समजू शकलो असतो? गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

आपण लिए जे मिले, विछड़ क्यों रोवण।

हे परमात्मा, हे जर आमच्या वशात असते तर मग आम्ही तुझ्यापासून दूरावून का बरे दु:खं सोसत रडत फिरलो असतो. कबीर साहेब सांगतात, ''ज्याप्रमाणे दया करून तुम्ही नाम दिलेले आहे आणि नामाचा उत्साह निर्माण केलेला आहे, त्याप्रमाणे आता आपली दयेची दृष्टी टाका जेणेकरून आम्ही नामस्मरण करू शकू. नामात समरस होऊन आम्ही नामरूपच होऊ शकू.'' गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

नानक नदरी नदर निहाल।

जर परमात्मारूपी गुरूंनी प्रेमभरात येऊन दया केली तेव्हाच आपण नामाची कमाई करू शकतो, सत्संगात जाऊ शकतो. गुरू गोविंद सिंहजींचा भाई नंदलाल नामक नामाची कमाई केलेला एक शिष्य होता. त्याने आपल्या गुरूंपुढे उभे राहून हीच विनंती केली की:

तेरी ईक नजर है, मेरी जिंदगी का सवाल है।

हजरत बाहु सांगतात:

इक नजर जे आशिक वेखे, लख हजारां तारे हू।
लख निगाह जे आलिम वेखे, किसे न कद्धी चाढ़े हू।।

बिरह सतावै मोहिं को, जिव तड़पै मेरा।।
तुम देखन की चाव है, प्रभु मिलो सवेरा।।

सर्व धर्म अशी आशा निर्माण करवितात की मेल्यानंतर स्वर्ग मिळतो, मुक्ती मिळते, परंतु संत या गोष्टीवर विश्वास ठेवत नाहीत. संत सांगतात, आपणांस कल्पनाच नसते की मृत्युनंतर मुक्ती मिळेल की नाही, त्यावेळी आपली काय परिस्थिती असेल? आपण जर जिवंतपणी अशिक्षित असल्यास मृत्युनंतर शिकलेले ज्ञानी बनू शकत नाही, तसेच जर आपण जिवंत असता कामी, क्रोधी व लालची असून वाईट कर्मं करीत असल्यास मृत्युनंतर आपण महात्मा बनू शकत नाही. महात्मा बनावयाचे असल्यास जिवंत असतानाच आपणांस महात्मा बनावे लागेल, जिवंतपणीच परमात्म्याची भक्ती करावी लागेल व जिवंतपणीच मुक्ती प्राप्त करावी लागेल. भक्त नामदेवजी सांगतात:

मुए होए जे मुक्ति देवोगे, मुक्ति न होवे कोयला।

कबीर साहेब अशा एका पत्नीचे उदाहरण देतात जी माहेरी बसून आपल्या पतीच्या संदेशाची वाट पहात असते. पती तिच्यासाठी संदेशही पाठवितो आणि सोबत डोलीदेखील पाठवितो. वास्तविकत: नववधुच्या

डोलीस चार अविवाहीत पुरूष उचलतात, आजही हिंदुस्थानात ही प्रथा पहावयास मिळते. परंतु या डोलीस उचलणारे पुरूष यमदूत असतात. यमदूत त्या पत्नीरूपी आत्म्यास पतीच्या महालात नेण्याऐवजी एका निराळ्याच देशात घेऊन जातात. तेथे पत्नीरूपी आत्म्यास आपले पती परमात्मा गुरूदेवही दिसत नाहीत, आपले संगी–सोबतीही दिसत नाहीत आणि आपल्या समाजातील ते लोकही दिसत नाहीत ज्यांनी येथे मुक्तीची आणि स्वर्गप्राप्तीची आश्वासने दिली होती.

त्यास्थितीत पत्नीरूपी आत्मा त्या यमदूतांपुढे विनवणी करते की माझी डोली परत त्याच देशात घेऊन जा. तिला परत संसारात येण्याची इच्छा असते, परंतु तेथे तिचे सांगणे कोण ऐकतो? तेथे कोणी संगी–साथीही नसतो व ओळखीची एखादी व्यक्तीही नसते.

महात्मा आपणांस एक उदाहरण देऊनही समजावतात की ज्याप्रमाणे एखादी पत्नी रात्रीच्यावेळी आपल्या पतीपासून विभक्त होऊन रस्ता विसरते. तिला एक असा मार्गदर्शक मिळतो जो तिला आश्वासन देतो की मला रस्ता माहित आहे, मी तुला आरामात तुझ्या घरी पोहचवेन, परंतु तो स्वतःच विषय–विकारांच्या जंगलात भटकत असतो. भाई, पुरोहित, पादरी सर्व याच श्रेणीत येतात, जे असे आश्वासन देतात की आम्हांस सर्व रस्ते माहीत आहेत, आम्ही तुम्हांस सहज आपल्या घरी पोहचवू. जेव्हा ती पत्नीरूपी आत्मा पहाते की ज्याने मला आश्वासन दिले होते तो स्वतःच जंगलात मार्ग चुकून भटकत आहे. यास तर रस्ता माहीतच नाही. त्यामुळे ती अत्यंत त्रस्त व दुर्दशाग्रस्त होते की मी अशा मार्गदर्शकाचा पदर (आश्रय) का पकडला.

संत–महात्मा प्रेमाने सांगतात की आपण अशा व्यक्तीचा पदर पकडावा जो स्वतः त्या मार्गाशी परिचित असेल. बाह्यजगातील मार्गदर्शनापेक्षा संतांची आंतरिक मार्गदर्शनाची ड्युटी वाढते. गुरू नानकदेवजी सांगतात:

बिखड़े दाव नंधावे मेरा सतगुरु।

काळाने आत्म्यांची फसवणूक करण्यासाठी अशा प्रकारची दिशाभूल करणारी चक्रव्यूह रचना केलेली आहे की जो दररोज तेथे जात नाही, तिथल्या रचनेचा जाणकार नाही तो आपणांस तेथे कसा घेऊन जाऊ शकतो? पुढे खूप वाकडेतिकडे रस्ते आहेत. तेथे कोणी सुशिक्षित असो वा विद्वान असो, कोणीही आपणांस तेथे घेऊन जाऊ शकत नाही.

तुम देखन की चाव है, प्रभु मिलो सवेरा।।
नैना तरसै दरस को, पल पलक न लागै।।

आता आपण सांगता,''केवळ तुमच्या दर्शनाची, प्रेमाची आणि तुम्हांस भेटण्याची तीव्र इच्छा आहे. डोळ्याच्या पापणीस पापणी लागत नाही की कधी तुम्ही नजरेस पडाल आणि मी तुम्हांस या नजरेत कैद करून घेईन, ना मी इतर कोणास पाहीन व ना तुम्हांस इतर कोणास पाहू देईन.'' कबीर साहेब सांगतात:

जब आवें तूं आँख में आँख झांप मैं लूं। न मैं देखूं और को न तुझे देखन दूं।।

परमात्मा कृपाल नेहमी लैला–मजनूंचे उदाहरण देऊन समजावत असत की,''त्यांचे मजाजी (सांसारिक) प्रेम होते, तरीही लैला–मजनूं विषय–विकारांच्या जाळ्यात अडकलेले नव्हते. त्यांचे दृष्टीप्रेम होते. एक उंटस्वार लैलाच्या शहरात चालला होता. लैलाला संदेश पाठविण्यासाठी मजनूं त्याच्या सोबत बारा मैल धावत गेला की लैलास हे सांग आणि ते सांग, परंतु लैलाची गोष्ट काही संपलीच नाही.

याचप्रमाणे लैला मजनूंच्या इतिहासात येते की एकदा मजनूं एका कुत्र्याचे प्रेमाने चुंबन घेत होता. एका मनुष्याने त्यास विचारले की तू कुत्र्याचे चुंबन का घेत आहेस? त्यावर मजनूं म्हणाला हा कधी–कधी लैलाच्या गल्लीत चक्कर मारून येतो. असेच एके दिवशी वारा लैलाच्या घराच्या दिशेने चालला होता, मजनूं वाऱ्यालाच संदेश देऊ लागला की तू लैलाला माझ्या

प्रेमाची गोष्ट सांग. लैला काळी होती आणि मजनूं गोरा होता. कोणीतरी मजनूंला टोमणा मारला की लैला इतकी सावळी असून तू तिच्याशी एवढे प्रेम करतोस? मजनूं म्हणाला की तुला लैलाचा अर्धाच चेहरा दिसतो, मला तर लैलाचा संपूर्ण चेहरा दिसतो. तू लैलास मजनूंच्या नेत्रांनी पाहिलेस तर तुला समजेल की रूप सुंदर नसून प्रेम सुंदर असते. तोच चेहरा सुंदर वाटू लागतो ज्याच्याशी तुझे प्रेम असते.

माझ्या गावातील एका खास नातेवाईकाने मला प्रश्न विचारला होता,''तू कृपालजींवर स्वत:स समर्पित करून टाकले आहेस, शेवटी ते देखील एक मनुष्यच आहेत!'' मी प्रेमाने त्यास हसत-हसत म्हटले,''जर तू त्यांना माझ्या नेत्रांनी पाहिलेस तर तुला कळेल की त्यांच्या रोमारोमातून करोडो सूर्य फूटून-फूटून निघत आहेत. जर तू ते पहायचा प्रयत्न करशील तर सूर्याच्या दिशेने पाहू देखील शकणार नाहीस. त्यांचे तेज सूर्यापेक्षा अधिक आहे. सूर्य अत्यंत तप्त आहे परंतु ते तप्त नाहीत. चंद्र जरी शांत व शीतल असला तरी ते चंद्रापेक्षा शांत आणि शीतल आहेत. चंद्रावर डाग आहेत परंतु परमात्मा कृपालांवर डाग नाहीत.''

जेव्हा त्याच माणसाने महाराज कृपालजींकडून नाम घेतले तेव्हा मी त्यास विचारले,''कसे वाटले?'' तो म्हणाला,''मी काय सांगू, त्यांचे डोळे सिंहाच्या डोळ्यांसारखे आहेत. त्यांचा प्रकाश माझे नेत्र सहन करू शकले नाहीत. आता माझ्या मनात कोणताही प्रश्न बाकी राहिलेला नाही.

आमच्या सर्व भावंडांमधील सर्वात मोठ्या भावाच्या मनात माझ्यासाठी सहानुभूतीची लाट उफळून आली तेव्हा तो म्हणाला,''तुझ्यावर कृपालने जादूटोणा केलेला आहे. तुझे डोके ठिकाणावर नाही, तू रात्रंदिवस निद्रावस्थेत-जागृतावस्थेत त्यांचेच स्मरण करीत रहातोस. चल तुला अमृतसर येथील वेड्यांच्या इस्पितळात नेऊन तपासून घेऊया, जेणेकरून तुझ्या वेडेपणाचा इलाज व्हावा.'' मी त्यास हसून म्हटले,''खरोखरीच त्यांनी माझ्यावर जादू

केलेली आहे, जिच्या प्रभावामुळेच मी हे सर्व बोलत आहे. परंतु ही माझ्या वशातील गोष्ट नाही. प्रिय भावा, तू स्वत:चे डोके ठिकाणावर आण, माझ्या डोक्याची चिंता करू नकोस. अंतसमयी तुझा हेच सांभाळ करतील.''

काही वर्षांपूर्वी जेव्हा माझ्या त्याच भावाचा अंतसमय आला, तेव्हा तो अचानक बाहेरून आला व म्हणू लागला,''मला चार कसायांनी धरले आहे.'' थोड्यावेळाने तो पुढे म्हणू लागला की,''माझा परमात्मा कृपालजींनी बचाव केलेला आहे.'' पूर्वी माझ्या कुटुंबातील सदस्य सत्संगात येत नसत आणि नामदानही घेत नसत. त्यानंतर माझ्या कुटुंबातील सदस्यांनी नामदानही घेतले व आता दरमहा सत्संगासाठीदेखील नियमीत येतात. हे सर्व आपल्या लक्षात तेव्हाच येते जेव्हा आपण गुरूंनी अंतसमयी केलेला आत्म्याचा सांभाळ पाहतो, गुरूंचे प्रेम अनुभवतो आणि गुरूंच्या शिकवणीवर अंमल करून, अंतर्यात जाऊन स्वत:च्या नेत्रांनी सत्याचा दृष्टांत पाहतो.

जेव्हा मी कॅनेडा–कॅलगरीमध्ये सत्संगासाठी गेलो असता अमेरिकेतील एक वयोवृद्ध महिला तेथे आली. तिने आपल्या पतीचा सांभाळ कसा झाला याचा वृत्तांत सांगितला की मी आणि माझे पती दोघेही नामधारी नव्हतो, परंतु माझ्या दोन्ही मुली नामधारी आहेत. आमच्या घरी आपली आणि महाराज कृपालजींविषयी चर्चा होत असते. आम्हांस ऐकून आनंद होतो व आमचा विश्वासदेखील आहे. काही दिवसांपूर्वी जेव्हा माझ्या पतीचा अंतसमय आला तेव्हा तुमच्या गुरूदेवांनी त्यांचा केलेला सांभाळ आम्ही पाहिला. मला जरासुद्धा शंका नाही की तुमच्या गुरूंनी माझ्या पतीचा सांभाळ केला. मी कॅलगरीमध्ये केवळ तुमचा धन्यवाद करण्यासाठी आले आहे. तिने तेथे सात दिवस सत्संग ऐकला. माझा हे सर्व सांगण्यामागचा उद्देश इतकाच की आपण बाहेरून तर त्यास मनुष्यच मानतो परंतु तो साधारण मनुष्याहून श्रेष्ठ असतो.

बुल्लेशाहांना त्यांच्या बांधवांनी विचारले की तू सैयद जातीचा असून अराई जातीच्या मनुष्याकडे का जातोस? इनायत शाहांमध्ये अशी कोणती

विशेषता आहे? बुल्लेशाहा म्हणाले, जर कोणी बाह्यदृष्टीने इनायत शाहांना पाहिले तर त्यांचे चामड्याचेच शरीर आहे व त्यांनी इतर मनुष्यांप्रमाणे अंगात कपडेच घातलेले आहेत, परंतु जर कोणी अंतर्यात जाऊन पाहिले तर मग तो स्वर्गावर थुंकण्यासदेखील तयार होणार नाही. गुरू नानकदेवजी सांगतात:

गुरु को मानुख का रूप न जान।

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

हर जिओ नाम पड़्यों रामदास।

बुल्लेशाहदेखील सांगतात:

मौला आदमी बन आया, वाह वाह आया जग जगाया।

हा गरीब आत्मा जो आपल्यासमोर बसलेला आहे, जेव्हा परमात्मा कृपालजींच्या दयेने त्याच्या हे लक्षात आले तेव्हा तो हेच म्हणाला:

रब बंदा बणके आया, आके जग जगाया।

त्याने मनुष्यजन्म तर सुप्त आत्म्यांना जागृत करण्यासाठीच धारण केलेला असतो. तो संसारात रहात असतानाही सांसारिक मल–विकारांमध्ये लडबडत नाही. त्याचे खरे स्वरूप निराळेच आहे. स्वामीजी महाराज सांगतात:

गुरु मोहे अपना रूप दिखाओ। ऐह भी रूप पियारा मो को, पर ओह वी दिखलाओ।।

आपली अलिफ–बे गुरूंच्या देहापासून सुरू होते. जर आपले गुरूंच्या देहावर प्रेम नसेल तर आपण अंतर्यात एक पाऊलही पुढे टाकू शकत नाही. संत देह धारण करून आले नसते तर आपणांस अंतर्यात जाण्याची युक्ती कोणी सांगितली असती? कोणी आपल्या चुका सांगितल्या असत्या? कोणी आपल्या सुप्त आत्म्यास जागृत केले असते?

दर्दवंद दीदार का, निसि बासर जागै।।
जो अब के प्रीतम मिलैं, करूँ निमिष न न्यारा।।

कबीर साहेब सांगतात, ''ज्यास विरहाचे दु:खं आहे काय तो रात्री आरामात झोपू शकेल? डोळे बंद होत नाहीत, डोळे सदैव कोणाचीतरी वाट पहात असतात. जर माझ्या आत्म्याचे प्रिय गुरू मला आता भेटले, एका क्षणासाठी त्यांनी माझा आंतरिक पडदा उघडून मला दर्शन दिले तर मी त्यांना एका सेकंदासाठीदेखील नजरेआड होऊ देणार नाही.''

खोल तनी गल लाया सज्जन बिथ रही न मासा।
सज्जन सेती सज्जन मिलया जैसे खंड पतासा।।

परमात्मा कृपाल सांगत असत की,''ज्यांच्या रात्री बनल्या (नामस्मरणात व्यतीत झाल्या) त्यांचे सर्वकाही बनले.'' मी नेहमी सांगत असतो की बालपणापासूनच माझ्या नशिबात पहाटेची झोप नव्हती.

अब कबीर गुरु पाया, मिला प्रान पियारा।।

कबीर साहेबांनी संपूर्ण वाणीत प्रेमाने सांगितले की, माझे प्रेम तुमच्या नामाशी जडलेले आहे. मी रात्रंदिवस तुमची आठवण काढतो. मला कृपा करून तुमचे दर्शन द्या. मला कोणत्याही सांसारिक वस्तूची गरज नाही. मला फक्त तुमच्या **दर्शनाची ओढ** लागलेली आहे. तुम्ही माझ्या अंतरातील पडदा बाजूस सारून मला दर्शन दिलेत तर मी तुम्हांस पुन्हा एका सेकंदासाठीदेखील माझ्यापासून दूर जाऊ देणार नाही. तुम्ही मला माझ्या प्राणांपेक्षा प्रिय आहात.

कबीर साहेब अखेरीस म्हणतात माझ्या प्राणांपेक्षा प्रिय गुरू मला भेटले आहेत आणि माझा आत्मा तृप्त झाला आहे. ज्याप्रमाणे कबीर साहेबांनी प्रेमाने गुरूंचा महिमा वर्णिलेला आहे, गुरू प्रेमाच्या गोष्टी सांगितल्या आहेत, आपणही आपल्या अंतरात तशी तळमळ निर्माण केली पाहिजे, प्रेम निर्माण केले पाहिजे आणि आपले जीवन सफल बनविले पाहिजे.

***

धन्य अजायब

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील सत्संगाचे कार्यक्रम

संतबाणी आश्रम १६ पी. एस. राजस्थान येथे परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील सत्संगाचे कार्यक्रम

२९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०१७

३ ते ५ नोव्हेंबर २०१७

१ ते ३ डिसेंबर २०१७

मुंबई येथे परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील सत्संगाचा कार्यक्रम

३ ते ७ जानेवारी २०१८